# // प्रेस-नोट//

➤ सालासर क्लासिक बिल्डिंग , नगर भवन, भाईंदर (प.) येथील आगीवर नियंत्रण मिळवण्यास मिरा भाईंदर महानगरपालिका अग्निशमन विभागास यश.

दि. ०४/१०/२०२५ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सालासर क्लासिक बिल्डिंग , नगर भवन, भाईंदर (प.) परिसरात लागलेल्या भीषण आगीवर नियंत्रण मिळविण्यात अग्निशमन विभागास यश प्राप्त झाले आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाच्या स्व. कल्पना चावला या मुख्य कार्यालयात दि. ०४/१०/२०२५ रोजी दुपारी ठिक १५: १० वाजता वर्दी प्राप्त झाली असून मांडली तलाव, सालासर क्लासिक बिल्डिंग , नगर भवन भाईंदर (प.) येथे आग लागल्याची माहिती प्राप्त झाली. माहिती प्राप्त होताच तात्काळ सदरच्या वर्दीवर स्व. कल्पना चावला अग्निशमन दलाचे अधिकारी व कर्मचारी वॉटर टेंडरसह **(वाहन क्र. एम एच 04 एल ई.0938 वाहन क्र. एम एच 04 एल ई 2627 वाहन क्र. एम एच 04 जी. एच. 4933, वाहन क्र. एम एच 04 एल ई 6868)** घटनास्थळी रवाना झाले व ठिक १५: १४ मिनिटानी घटनास्थळी पोहचुन पाहणी केली असता सदरची आग ही सातव्या मजल्यावरील ए -७०२ मध्ये लागल्याचे निदर्शनास आले. तात्काळ सदरच्या आगीवर अग्निशमन वाहनांच्या साह्याने होजची लाईन टाकुन आग विझविण्यास सुरुवात केली. आगीचे रौद्र रुप पाहता सिल्वर पार्क अग्निशमन केंद्रातील अधिकारी व कर्मचारी यांना वाहनांसह पाचारण करण्यात आले. तात्काळ त्या इमारतीमधील अदानी इलेक्ट्रिसीटी कर्मचा-यांना पाचारण करुन विद्युत पुरवठा खंडीत केला त्याचबरोबर महानगर गॅसच्या कर्मचा-यांना पाचारण करुन तेथील गॅस पाईप लाईन बंद केली. आगीचे वाढते प्रमाण बघता इमारतीमधील अंदाजे 150 लोकांना तात्काळ इमारतीमधुन बाहेर काढुन इमारत खाली करण्यात आली. साधारणत: अंदाजे 1 तासात पुर्ण आगीवर नियंत्रण मिळविण्यात आले व आग पूर्ण विझाविण्यास अग्निशमन विभागास यश प्राप्त झाले. सदर आगीमध्ये फ्लॅट क्र. 702/ए या सदनिकेचे संपुर्ण नुकसान झाले असुन त्यांचे महत्वाचे वैयक्तिक वस्तू त्यांना देण्यात आल्या तसेच फ्लॅट क्र. 703/ए व फ्लॅट क्र. 704/ए या सदनिकेतील घरगुती साहित्याचे काही प्रमाणात नुकसान झाले आहे.

सदर इमारतीमधील फ्लॅट क्र. 702/ए चे मालक श्री पारस मकानी , फ्लॅट क्र. 703/ए जयदयाल चौरसिया व फ्लॅट क्र. 704/ए चे मालक स्वरुप भौमीक हे आहेत. सदर घटनेत कोणतीही व्यक्ती जखमी वा मृत्यु पावलेले नाही. तसेच सदर घटनास्थळी अग्निशमन विभागाचे एकुण 04 वॉटर टेंडर व 01 टर्न टेबल लॅडर व 6 अधिकारी व 30 कर्मचारी कार्यरत होते. तसेच स्वत: मुख्य अग्निशमन अधिकारी सदर आगीच्या वर्दीवर हजर होते. व त्यांच्या मार्गदर्शनाखाली पुर्णपणे आग विझविण्यात आली.

सदर आगीच्या अनुषंगाने आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने प्राथमिक चौकशी करण्यात येऊन याबाबतचा अहवाल मा. आयुक्त सो. यांना सादर करण्यात येईल.

सदर घटनास्थळी लागलेल्या आगीची माहिती वेळोवेळी मा. आयुक्त श्री. राधाबिनोद शर्मा सो,अतिरिक्त आयुक्त श्री. संभाजी पानपट्टे सो व उप-आयुक्त श्री. सचिन बांगर सो यांना दिलेली आहे. सदर घटनास्थळी लागलेली आग ही विझलेली असून तेथील परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आलेली आहे.

(डॉ. सचिन बांगर)
उप- आयुक्त (अग्निशमन)
मिरा भाईंदर महानगरपालिका